**पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड कार्यालय** पत्ता- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल, पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३

ईमेल आयडी – piplanning.pcpc-mh@gov.in

जा.क्र./पोउआ/वाहतूक/उपक्रम/५४४६३५/२०२३, पिंपरी-चिंचवड, दि.३०/११/२०२३

# प्रे स नो ट

## वाहतुक शाखा, पिंपरी-चिंचवड

-----००-----

पिंपरी चिंचवड औद्योगिक शहरामध्ये मोठया प्रमाणात परराज्यातून तसेच महाराष्ट्रातील सर्व जिल्हयातून नोकरी व रोजगारनिमित्त अनेक नागरिक स्थायिक झालेले आहेत. पिंपरी-चिंचवड शहरामध्ये दळणवळणासाठी मोठया प्रमाणात वाहने वापरली जातात. त्यामध्ये दुचाकी वाहनांचा वापर मोठया प्रमाणात होत आहे. वाहन चोरी तसेच बनावट नंबर प्लेटचा वापर लक्षात घेता सदर घटनांना प्रतिबंध करणे व त्यांचा शोध घेण्याच्या उद्देशाने पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेमार्फत ई-चलन कार्यप्रणाली अंतर्गत तयार केलेल्या नाकाबंदी ॲपद्वारे वाहन तपासणी हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेअंतर्गत **१४** वाहतूक विभागातील प्रत्येक **०२** पोलीस अंमलदार यांची एक टिम अशा एकुण **१४ टिम** व पिंपरी-चिंचवड वाहतूक नियत्रंण कक्ष यांचे **०६ टिम** अशा एकुण **२० टिम** तयार करण्यात येत आहेत. सर्व टिम हया पिंपरी चिंचवड शहर अंतर्गत येणाऱ्या रेल्वे स्टेशन, बस स्थानक, शॉपिंग मॉल, शाळा, उड्डाणपुलाखालील पार्किंग, सोसायटी पार्कीग, बेवारस वाहने, इ. ठिकाणी पार्क केलेल्या दुचाकी नाकाबंदी ॲपद्वारे चेकींग करुन जास्तीत जास्त वाहनांची तपासणी करुन वाहन चोरी/बनावट नंबर प्लेट वापरणे इ.घटनांचा शोध घेणेकामी व प्रतिबंध करणेकामी प्रयत्न करणार असुन यामुळे पिंपरी चिंचवड हद्दीतील वाहन चोरी, बनावट नंबर प्लेट इत्यादी गुन्हयांना प्रतिबंध होईल.

सदरचा उपक्रम मा.पोलीस आयुक्त, श्री.विनयकुमार चौबे, मा.पोलीस सह आयुक्त, श्री.संजय शिंदे, मा.अपर पोलीस आयुक्त, श्री.वसंत परदेशी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, श्री.बापू बांगर व वाहतूक शाखेचे सर्व पोलीस अधिकारी तसेच अंमलदार यांचे मार्फतीने **"वाहन तपासणी उपक्रम"** दिनांक ०१.१२.२०२३ रोजी पासुन सुरू करण्यात येत आहे.

30/11/2023.

**(बापू बांगर)**
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड

**प्रति,**

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नवीन मध्यवर्ती इमारत पुणे

**प्रत** : १)पोलीस निरीक्षक, प्रेसरूम पोलीस आयुक्त, कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर
/-सदर प्रसेनोटच्या प्रती पत्रकारांना देऊन,सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.